“लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेचा विवेचक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या

मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी विषयात पीएच.डी. पदवीसाठीचा

संशोधन कार्याचा आराखडा

संशोधक

वसुंधरा दत्तात्रय तोटावार

एम . ए. (मराठी) , सेट

द्वारा : श्री. नरेश मेरगेवाड, रा. विठ्ठलवाडी गल्ली,

हिमायतनगर, जि. नांदेड - ४३१८०२

मार्गदर्शक

डॉ . श्रीराम गोविंद गव्हाणे

मराठी विभागप्रमुख

लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय , धर्माबाद

धर्माबाद. जि. नांदेड - ४३१८०९

ऑगस्ट २०२५

लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेचा विवेचक अभ्यास

प्रस्तावना : १९९०नंतर मराठी कवितेचे एक वेगळेपण लक्षात येते. जागतिकीकरणानंतर सर्व स्तरातील झालेले मूलगामी स्वरूपांचे बदल सर्वत्र आढळून येतात. विशेषत: सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाची मूल्ये बदलली. नवी आव्हाने व सर्व बदलांना स्वीकारून समाज पुढे जात असताना, मराठी साहित्यात कवी, लेखकांनी विविध साहित्य प्रकारांतून व्यक्त केलेल्या भावना अनुभवता येतात. या पार्श्वभूमीवर १९९० नंतर कविता लिहिणारे कवी लक्ष्मण लच्छमन्ना मलगीरवार हे मराठीतील महत्त्वाचे कवी आहेत. 'आभाळ पाहताना’ (२००३) ‘चैत्रपाळी’ (२००६) , ‘ऋतुगंध’ (२०१९) , ‘ओले रान’ (२०२०) , ‘उजळावया आलो वाटा’ (२०२१) हा त्यांच्या काव्यलेखनाचा प्रवास आहे. ग्रामीण जीवन व जाणिवांचे सूक्ष्म निरीक्षण ही त्यांच्या कवितेतून लक्षात येणारी महत्त्वाची ओळख आहे. सामाजिक वास्तव, बदलते सामाजिक जीवन संदर्भ व नव्या मूल्यांमुळे निर्माण होण्याऱ्या प्रश्नांना कवी मलगीरवार तटस्थ राहून अनुभव घेताना कवितेतून लक्षात येतात. कवितेसारख्या एका महत्त्वाच्या लेखन- प्रकारात ते तीन दशकांहून अधिक काळ लेखन करीत आहेत. ग्रामीण लोकजीवन,लोकपरंपरा, लोकसंस्कृती व बोलीभाषा आदी बाबी कवी मलगीरवारांच्या कवितेतील बलस्थाने आहेत. समकालीन प्रश्न व समाजवास्तवाचे नेमके चित्रण ते आपल्या कवितेतून अभिव्यक्त करतात. त्यांनी लिहिलेल्या कवितांमुळे २१व्या शतकातील मराठी कवितेतील कवी म्हणून त्यांचे महत्त्वाचे स्थान आहे. या बाबी लक्षात घेऊन कवी मलगीरवार यांच्या समग्र कवितेचा अभ्यास करावयाचा आहे.

विषयाचे महत्त्व :

साठोत्तरी मराठी वाङ्मय प्रवाहामध्ये ‘ग्रामीण साहित्य’ हा एक महत्त्वाचा प्रवाह आहे. शिक्षणाचा प्रसार होऊन पुढे शेतकऱ्यांची मुलं कष्टांनी शिकू लागली. वर्तमानकालीन वास्तवाचे भान ठेऊन आनंद यादव, उद्धव शेळके, रा. रं. बोराडे, भास्कर चंदनशिव आदी

लेखक प्रारंभी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून लिहिताना आढळून येतात. १९६० पूर्वीच्या काळातील ग्रामीण जगण्याचे अवास्तवदर्शी चित्रण साहित्यातून प्रकाशित झालेले होते. ग्रामीण परिसरातील खेड्यापाडयांतून शिक्षणामुळे पुढे आलेले व वास्तवाचे भान ठेऊन लेखन करणाऱ्या लेखक-कवींना ते लेखन कृत्रिम वाटू लागले. पुढे नव्या जोमाने, नव्याने लिहिणाऱ्या ग्रामीण लेखकांचे वास्तवदर्शी लेखन कविता, कथा, कादंबरी व आत्मचरित्र आदी प्रकारांतून प्रकाशित होऊ लागले.

१९८० -९० च्या दशकानंतर महाराष्ट्रातील सामाजिक,सांस्कृतिक बदलांमधून, समाज जीवनावर झालेल्या परिणामातून विपुल प्रमाणात लेखन प्रकाशित होऊ लागले. शेषेराव मोहिते, इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, अजय कांडर, जगदीश कदम, नागनाथ पाटील, केशव पाटील, केशव देशमुख,एकनाथ पाटील, संतोष पद्‌माकर पवार ,श्रीराम गोविंद गव्हाणे, ऐश्वर्य पाटेकर, रवी कोरडे, कल्पना दुधाळ, गणेश मरकड, कैलास दौड आदी कवींची ची यादी २१ व्या शतकात लेखन करणाऱ्या वाढत वाढत जाते. मराठी ग्रामीण कविता लेखनातून सामाजिक वास्तवाचे भान ठेऊन लेखन करणारी एक फळी निर्माण झाली. या कालखंडातील कवितालेखनातील महत्त्वाचे नाव म्हणून कवी लक्ष्मण मलगीरवार हे एक आहेत.

एकविसाव्या शतकाच्या पूर्वदशकात व एकविसाव्या शतकाच्या प्रारंभानंतर कवी मलागीरवारांनी काव्यलेखन केले आहे. ‘चैत्रपाळी’, ‘आभाळ पाहताना’, ‘ऋतुगंध’, ‘ओले रान’, उजळावया आलो वाटा’ या कवितालेखनाने समकालीन कवितेत त्यांचे स्थान व वेगळेपण लक्षात घ्यावयाचे आहे. त्यासाठी प्रस्तुत संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

स्वरूप आणि व्याप्ती : -

प्रस्तुत शोधप्रबंधात कवी लक्ष्मण लच्छमन्ना मलगीरवार यांच्या समग्र कवितेचा अभ्यास करावयाचा आहे. १९९० नंतरच्या मराठी कवितेत आलेल्या नव्या अनुभव जाणिवा

व कवी मलगीरवार यांच्या कवितेच्या वेगळेपणाचा अभ्यास या संशोधानामागील उद्देश आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे : -

प्रस्तुत विषयाचा विवेचक अभ्यास करण्यासाठी काही उद्दिष्टे निश्चित केले गेले आहेत. ते असे -

१) कवी लक्ष्मण मलगीरवार यांच्या काव्य लेखनामागील प्रेरणांचा अभ्यास करणे.

२) कवी लक्ष्मण मलगीरवार यांच्या काव्यलेखनाचे स्वरूप अभ्यासणे.

३) कवी लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेतील जीवन दर्शनाचे वेगळेपण शोधणे.

४) कवी लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेतील वाङ्‌मयीन मूल्यांचा शोध घेणे.

५) समकालीन कवितेतील कवी लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेच्या वेगळेपनाचा अभ्यास करणे.

गृहीतके :

१)कवी लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेतील आशय सौंदर्य.

२) कवी लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेतील निसर्ग प्रतिमा व मानवी जीवनाचे दर्शन.

३) सीमा भागातील (देगलूर, जि. नांदेड) बोलीभाषा व कवीचे काव्यलेखन.

४) कवी लक्ष्मण मलगीरवार यांची कविता आणि लोकगीतांचा परंपरेशी असलेलं नातं.

५) कवी लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेतील अल्पाक्षरत्व.

संशोधन पद्धती :

कवी लक्ष्मण मलगीरवार यांच्या समग्र कवितेचा अभ्यास करताना वर्णनात्मक, ऐतिहासिक व तौलनिक संशोधन पद्धतीचा अवलंब प्रस्तुत संशोधनात करावयाचा आहे.

संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी मराठी कवितेच्या वाटचालीचा आढावा घेणारे मूलभूत संदर्भग्रंथ, विविध अभ्यासकांचे कवितेसंबंधीचे शोधप्रबंध, मराठीतील महत्त्वाची नियतकालिके, शब्दकोश , वृत्तपत्रे इत्यादी संदर्भांचा या संशोधनासाठी उपयोग केला जाईल. मलगीरवार यांची मुलाखत संशोधनासाठी उपयुक्त ठरेल म्हणून या संशोधनात मुलाखतीचा उपयोग केला जाईल. तसेच या कवितेचा भाषिक अंगाने अभ्यास केला जाईल. लोकगीते, लोकपरंपरा व लोकसमजुतीचा संबंध सदर कवितेशी जोडून अभ्यास करण्यासाठी लोकसाहित्य व कृषीपरंपरासंबंधीच्या संदर्भग्रंथाचा आधार घेतला जाईल .

प्रकरणाची मांडणी :

प्रकरण पहिले : २१ व्या शतकातील मराठी ग्रामीण कवितेची वाटचाल

मराठी साहित्यात विविध प्रवाह आढळून येतात . १९६० नंतर प्रामुख्याने ‘ग्रामीण साहित्य ‘ प्रवाह पुढे आला आहे . यामध्ये मोठ्या प्रमाणात कविता , कथा , कादंबरी , इत्यादी लेखन निर्माण झाले आहे. पुढे जागतिकीकरणाचे परिणाम मानवी जगण्यावर सर्व स्तरावर होऊ लागले. २१व्या शतकातील सामाजिक व सांकृतिक पर्यावरण झपाट्याने बदलत गेले. या दरम्यानच्या काळात मराठीत मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या कवितेचा अभ्यास करताना सदर प्रकरणात मराठी ग्रामीण कवितेच्या वाटचालीचा अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण दुसरे : लक्ष्मण मलगीरवार : व्यक्ती आणि वाङ्मय:

कवी लक्ष्मण मलगीरवार हे मराठीतील महत्त्वाचे कवी आहेत. देगलूर, जि. नांदेड या सीमावर्ती भागात त्यांचा जन्म झाला . मराठी, कन्नड व तेलुगु अशा संमिश्र भाषिक व सांस्कृतिक वातावरणात त्यांची जडणघडण झाली आहे. शेती – माती, निसर्ग हे त्यांच्या लेखनाचे व जगण्याचे आस्थेचे विषय आहेत . ती त्यांच्या जगण्याची प्रेरणा आहे. या सर्व अनुभूतीचे चित्रण त्यांच्या लेखनात अनुभवता येते . उदा . 'आभाळ पाहताना' , 'चैत्रपाळी' , 'ऋतुगंध' , 'ओले रान ' , 'उजळावया आलो वाटा'. कवी मलगीरवार यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व त्याच्या कवितांचा अभ्यास सदर प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण तिसरे : लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेतील आशय आणि अभिव्यक्ती :

कवी लक्ष्मण मलगीरवार यांची कविता ही निसर्ग आणि कृषी जगण्याशी जोडून येते . लोकभाषा , लोकजीवन व लोकपरंपरेचा प्रभाव तिच्यावर आहे. निसर्गाची विविध रूपे , विविध प्रतिमांधून कवी हे चित्र साकारातो आहे. कवी मलगीरवार यांच्या कवितांचे हे बलस्थान आहे. कवी मलगीरवार यांच्या कवितेत येणाऱ्या विविध जाणिवा , प्रतिमांचा अभ्यास सदर प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण चोथे : लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेतील भाषा , निसर्ग जाणिवा व प्रतिमा :

कवी मलगीरवार हे देगलूर, (जि नांदेड) येथे राहतात. ते त्यांचे जन्मगाव आहे . महाराष्ट्र व तेलंगणा या सीमाभागात त्यांचे वास्तव्य आहे . सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणातील संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेले आहेत. या सीमा भागातील बोलीभाषा , निसर्ग , लोकजीवन , कृषीजीवन , कवी मलगीरवारांनी आपल्या कवितांमधील विविध प्रतिमांमधून साकारलेले आहे. याचा अभ्यास सदर प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण पाचवे : लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेचे वेगळेपण :

कवी मलगीरवार यांची कविता एक सशक्त कविता आहे. ना. घ. देशपांडे, ना. धों. महानोर, बा.भ. बोरकर अशा महत्त्वाच्या कवींनी आपल्या प्रांतातील निसर्ग आणि सामाजिक, सांकृतिक संदर्भ ज्या ताकदीने आविष्कृत केले आहेत. त्याच वाटेवरची स्वतंत्र ओळख सिद्ध करणारी कवी मलगीरवार यांची कविता आहे. २१ व्या शतकातील संख्येने विपुल असणाऱ्या मराठी कवितेत कवी लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेचे वेगळेपण या प्रकरणात अभ्यासायचे आहे.

प्रकरण सहावे : उपसंहार

प्रस्तुत प्रकरणा मध्ये लक्ष्मण मलगीरवार यांच्या कवितेचा विवेचक अभ्यासक या अनुषंगाने कविता आणि कवितेतील निसर्ग जाणिवांचा आढावा घेऊन एकूण अभ्यासाचा निष्कर्ष या प्रकरणात मांडण्यात येईल.

संदर्भ ग्रंथसूची :

१) कवितेविषयी : वसंत आबाजी डहाके - स्वरूप प्रकाशन , औरंगाबाद.

२) आधुनिक मराठी कविता : एक दृष्टिक्षेप - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले - प्रतिभास प्रकाशन, पुणे.

३) संशोधन सिद्धांत आणि पद्धत - डॉ. सदा कऱ्हाडे - लोकवाङ्मगृह, मुंबई.

४) मराठी ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि समस्या - डॉ. आनंद यादव , मेहता पब्लिशिंग , पुणे.

५) ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास - चंद्रकुमार नलगे - रिया पब्लिकेशन, कोल्हापूर .

६) मराठी साहित्य संशोधन : नव्या दिशा - डॉ.अविनाश आवलगावकर (संपा) - प्रतिमा प्रकाशन पुणे.

७) स्वातंत्र्योत्तर मराठी कविता - डॉ. सुषमा करोगल (शोध) - प्रतिमा प्रकाशन, पुणे.
८) ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध :- डॉ नागनाथ कोत्तापल्ले - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे .

संशोधक

वसुंधरा दत्तात्रय तोटावार
एम . ए.(मराठी) सेट
द्वारा : नरेश मेरगेवाड, विठ्ठलवाडी गल्ली,
हिमायतनगर, जि. नांदेड . ४३१८०२

मार्गदर्शक

डॉ. श्रीराम गोविंद गव्हाणे